# कंत्राटी पदभरती जाहिरात
# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# आरोग्य विभाग पुणे महानगरपालिका

आय.एच.एफ.डब्ल्यू/पी.एम.सी/ दिनांक ०६ /०३ /२०२५

आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका यांचे नियंत्रणाखाली इंटिग्रेटेड हेल्थ अ‍ॅन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन अंतर्गत **राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)** मधील खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

**गुणांकन पद्धतीनुसार पदभरती**

| अ.क्र | पदाचे नाव | एकत्रित मानधन | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | संवर्ग | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी | प्रती महा र.रु.६०,०००/- | MBBS (MCI / MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य) | कमाल वयोमर्यादा ७० वर्षापर्यंत (वय वर्ष ६० नंतरच्या उमेदवारांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत) | अनु.जाती २<br>अनु.जमाती १<br>भजब १<br>भजक १<br>भजड १<br>विमाप्र १<br>इमाव १<br>एसईबीसी ३<br>ईडब्ल्यूएस ३<br>अराखीव ७ | २१ |
| २. | बालरोगतज्ञ – पूर्णवेळ (Pediatrician) | प्रती महा र.रु.७५,०००/- | MD PEDIATRIC /DNB (MCI / MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य) | | अनु.जाती १<br>विजाअ १ | २ |
| ३ | स्टाफ नर्स | प्रती महा र.रु.२०,०००/- | १२ वी उत्तीर्णसह शासकीय संस्था अथवा शासनमान्य संस्थेमधून जी.एन.एम/बी.एससी नर्सिंग कोर्स, अनुभव असल्यास प्राधान्य, MNC कडील नोंदणी अनिवार्य | शासकीय अधिकारी असल्यास वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (वय वर्ष ६० नंतरच्या उमेदवारांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत) | अनु.जाती १<br>अनु.जमाती १<br>विजाअ ३<br>भजब १<br>भजड १<br>विमाप्र १<br>इमाव ७<br>एसईबीसी २<br>ईडब्ल्यूएस २<br>अराखीव ६ | २५ |
| ४ | ए.एन.एम | प्रती महा र.रु.१८,०००/- | १० वी उत्तीर्णसह शासकीय संस्था अथवा शासनमान्य संस्थेमधून ए.एन.एम कोर्स, अनुभव असल्यास प्राधान्य, MNC कडील नोंदणी अनिवार्य | | अनु.जाती ९<br>विजाअ २<br>भजब ३<br>भजक २<br>भजड १<br>विमाप्र १<br>इमाव १४<br>एसईबीसी ५<br>ईडब्ल्यूएस १३<br>अराखीव ४ | ५४ |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी दिनांक ०७/०३/२०२५ ते १९/०३/२०२५ पर्यंत इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नवीन इमारत, चौथा मजला, शिवाजी नगर, पुणे ४११००५ येथे कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टी वगळता) ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारले जातील. तदनंतर अर्जाची छाननी करून उमेदवारांची पात्र / अपात्र इत्यादीबाबत सविस्तर माहिती वेळोवेळी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर **https://www.pmc.gov.in** प्रसिद्ध करण्यात येईल.

अर्जा सोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशील :-

I) पासपोर्ट साईज फोटो,

II) जन्म तारखेकरिता (वयाचा दाखला/दहावीचा टीसी/जन्म प्रमाणपत्र),

III) फोटो आयडी/रहिवाशी दाखला

IV) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र :-

अ) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, ब) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, क) अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेची MCI/MMC/MMC नोंदणी प्रमाणपत्र, ड) नोंदणी नूतनीकरण प्रमाणपत्र व ई) अनुभव प्रमाणपत्र या अनुषंगाने इतर आवश्यक सत्य प्रती व साक्षांकित प्रती २) सदरील पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) समिती अंतर्गत राहतील, त्याचा पुणे महानगरपालिका आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. ३) उमेदवाराकडून सदर अर्ज अर्धवट, अपूर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केला असल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्वीकारली जाणार नाही. ४) सदर अर्ज ऑफलाईन पद्धतीनेच घेण्यात येत असून, सदर उमेदवाराने राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन अर्ज सादर करण्यात यावा याची नोंद घ्यावी. ५) एकूण पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो. ६) सदरील पदे निव्वळ दिनांक २९/०६/२०२५ कालावधीसाठी भरायचे असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील. ७) महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्या संदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे. ८) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार १ दिवसाचा सेवाखंड देऊन पुढील नियुक्ती (११ महिने २९ दिवस) कालावधी करीता निर्णय घेण्यात येईल. ९) एकूण १०० गुणांची टक्केवारी राहील.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या<br>एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६० X ५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा १ वैद्यकीय अधिकारी पदाची आवश्यकता शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त MD/MS Diploma हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास MD/MS Diploma अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion = ६० X २०/१००=१२) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | **एकुण १०० गुण** |

१०) अनुभव शासकीय, निमशासकीय, राष्ट्रीय आरोग्य अभियान, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी अंतर्गत अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. ११) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल. ११) निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज), पुणे मनपा यांनी राखून ठेवले आहेत. १२) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल. परंतु अंतिम निर्णय प्रशासन घेईल. १३) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रम पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. १४) उपरोक्त पदांकरिता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करून गुणानुक्रमे यादी

तयार करण्यात येवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. १५) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. १६) सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतीक्षा यादीतील मेरीटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. १७) सदर अंतिम यादी ही तयार झालेनंतर पुढील १ वर्षासाठी वैध राहील. १८) उमेदवाराची निवड झाल्यास त्याला र.रु.५००/- च्या बाँड पेपरवर करार सादर करावा लागेल. १९) पत्र व्यवहाराचा पत्ता स्पष्ट आणि पूर्ण असावा. २०) उमेदवारांनी त्यांच्या स्वखर्चाने निवडीच्या ठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे. २१) उमेदवारांनी चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास किंवा निवड प्रक्रिया किंवा नियुक्ती सुरू झाल्यानंतर कोणत्याही वेळी कोणतीही माहिती रोखून ठेवल्याचे आढळल्यास त्यांना अपात्र ठरवले जाईल. तसेच, नियुक्ती झाल्यास, त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात येईल. २२) पुणे महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला किंवा इतर कोणत्याही संस्थेला अर्ज विकण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार दिलेला नाही याची नोंद घ्यावी. २३) जर उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आले किंवा खोटे बोलणाऱ्यांची व्यवस्था केल्याचे आढळून आले, तर त्याला निवडीपासून अपात्र ठरवले जाईल. २४) उमेदवारांना पुणे महानगरपालिकेसाठी मध्यस्थ असल्याची बतावणी करणाऱ्या व्यक्तीमार्फत नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

४/३/२५

(पृथ्वीराज बी पी)

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**

**तथा अध्यक्ष, एक्झिक्युटिव्ह कमिटी**

**आय.एच.एफ.डब्ल्यू.सोसायटी**

**फॉर पीएमसी**

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना सन २०२४-२५

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग

## पुणे महानगरपालिका

**प्रति,**
**मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**तथा अध्यक्ष, एक्झिक्युटिव्ह कमिटी**
**आय.एच.एफ.डब्ल्यू.सोसायटी फॉर पीएमसी**

विषय :- जाहिरात क्र:- ____________________

पदाचे नाव :- ____________________ या पदाकरिता अर्ज

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | उमेदवाराचे संपूर्ण नाव | :- | | | |
| २) | उमेदवाराच्या वडिलांचे संपूर्ण नाव | :- | | | |
| ३) | जन्म तारीख | :- | वर्ष | महिना | दिवस |
| | अक्षरी | :- | | | |
| | | | | | |
| | | | वय :- वर्षे पूर्ण | महिने | दिवस |
| ४) | राहण्याचा पत्ता | :- | | | |
| | | | | | |
| ५) | मोबाईल क्रमांक | :- | (नमूद करणे अनिवार्य) | | |
| ६) | इमेल आयडी | :- | (नमूद करणे अनिवार्य) | | |
| ७) | अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे | :- | होय/नाही | | |
| ८) | अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे. | :- | होय/नाही | | |
| | | | जातीचा प्रवर्ग :- | | |
| | | | जातीचे नाव :- | | |
| ९) | अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग | :- | (नमूद करणे अनिवार्य) | | |
| १०) | अर्जदाराकडे जात पडताळणीचे प्रमाणपत्र आहे. | :- | आहे/नाही | | |
| ११) | अर्जदार विवाहित आहे किंवा नाही | :- | आहे/नाही | | |

| १२) पदवी (Degree) पात्रता :- | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशिल | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| १३) पदव्युत्तर पदविका (Diploma) पात्रता :- | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशिल | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| १४) पदव्युत्तर पदवी (Post Graduation) पात्रता :- | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशिल | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| १४) इतर शैक्षणिक अर्हता पात्रता :- | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशिल | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| १५) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| १६) अर्ज सोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत :- | | | |
|---|---|---|---|
| १) | | ८) | |
| २) | | ९) | |
| ३) | | १०) | |
| ४) | | ११) | |
| ५) | | १२) | |
| ६) | | १३) | |
| ७) | | १४) | |

१६) वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खत्री करूनच हा अर्ज मी करीत आहे.मी असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेल्या अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :------------------------------------

दिनांक :-------------------------------------

स्वाक्षरी :- ________________________________

अर्जदाराचे नाव :- ________________________________